REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 7 | APRIL - 2024

# भारतीय आध्यात्मिक जागतिकीकरण

**प्रा. भालचंद्र देविदास पाटील**
संशोधक विद्यार्थी,(समाजशास्त्र) क.ब.चौ.उ.म.वि.जळगाव
सहयोगी प्राध्यापक
गी.द.म.कला,के.रा.न वाणिज्य व म.धा.विज्ञान महाविद्यालय,
जामनेर. जि.जळगाव.

**गोषवारा :**



भारत हा आध्यात्मिक वारसा असलेला देश आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेबरोबरच भारताची ही अध्यात्मविद्या विविध नव-आध्यात्मिक संघटनांच्या माध्यमातून संपूर्ण जगभर प्रसारित झालेली दिसून येते. ध्यान, योग आणि प्राणायाम यांचेद्वारे मनःशांती, व्यक्तिमत्व आणि आत्मविकास, उच्चतम पारलौकिक ध्येयाची प्राप्ती, स्वतःमधील क्षमतांचा विकास यासारख्या उद्दिष्टांच्या प्राप्तीसाठी देश विदेशातील साधक मोठ्या प्रमाणात या मार्गांकडे आकृष्ट होत आहेत. प्रस्तुत नव-आध्यात्मिक संघटनांचे कार्य हे धर्मनिरपेक्ष स्वरूपाचे दिसून येते. आपला मूळचा धर्म कायम ठेवून कोणतीही व्यक्ती या आध्यात्मिक मार्गांचे अनुसरण करून ऐहिक जीवनातील आनंदाबरोबरच पारलौकिक प्राप्तीची देखील अनुभूती घेऊ शकते; असा दावा या संघटनांकडून केला जातो. धर्म, वंश, लिंग, राष्ट्र यांच्या पलीकडे जाऊन मानवतावादी मूल्ये रुजविणे, आत्मविकासातून मानव विकास साध्य करणे अशी ध्येये ह्या आध्यात्मिक संघटनांची दर्शविली जातात. आर्थिक आणि व्यापारी क्रियाकलाप ही जागतिकीकरणाची अधिष्ठानात्मक पृष्ठभूमी देखील या आध्यात्मिक संघटनांनी उचललेली दिसते. वर्तमान काळात माहिती-तंत्रज्ञान, समाज आणि प्रसारमाध्यमांच्या प्रभावी उपयोगामुळे अशा संघटनांच्या प्रसारास जागतिक स्तरावर गती प्राप्त झालेली आहे. भारतीय आध्यात्मिक साधना आणि जीवन पद्धतीचा जागतिक विस्तार या निमित्ताने झालेला आहे. त्याचबरोबर काही अंशी भारतीय अंधश्रद्धांचेदेखील जागतिकीकरण झाले आहे असेही दिसून येते.

**पारिभाषिक शब्द** अध्यात्म, नव- आध्यात्मिक संघटना, ध्यान, कुंडलिनी, आत्मोन्नती, प्रार्थना, क्रियायोग, भूतशुद्धी, सुदर्शन क्रिया, मंत्र, भावातीत ध्यान,इ.

## पूर्व साहित्याचा अभ्यास

आध्यात्मिकता आणि नव-आध्यात्मिकता या विषयावर समाजशास्त्रीय अंगाने काही अभ्यास झालेले आहेत त्यात प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल तो म्हणजे उदय मेहता लिखित व पॉप्युलर प्रकाशन मुंबई द्वारे प्रकाशित **Modern Godmen in India: A Sociological Appraisal (1993)** हे पुस्तक होय. सदर ग्रंथात त्यांनी इस्कॉन, आचार्य रजनीश आणि महर्षी महेश योगी यांचा अमेरिकेतील प्रचार-प्रसार,अनुयायित्व यासंबंधी विस्ताराने चर्चा केलेली आहे. अझागु मीणा, वारुणी भाटिया आणि जॉयजित पाल यांनी लिहिलेला **Digital Divine: Technology Used by Indian Spiritual Sects (2020)** हा शोधनिबंध भारतीय नव-आध्यात्मिक संघटनांना आणि त्यांच्या प्रमुखांना जागतिक स्तरावर समाज माध्यमांमध्ये मिळणाऱ्या अनुयायीत्व आणि पाठिंब्याचा विस्ताराने विचार करतो. डॉ. सुदीप्ता रॉय यांनी सप्टेंबर २००२ मध्ये ई-संस्कृती ह्या ऑनलाइन ज्ञानकोशामध्ये मध्ये लिहिलेला **The Spiritual Heritage Of India** हा निबंध भारताच्या आध्यात्मिक वारशाची सविस्तर मांडणी करतो.

## संशोधनाची उद्दिष्टे :-

१. भारतीय अध्यात्माची जागतिक स्तरावरील स्वीकृती अभ्यासणे
२. जागतिकीकरणाच्या दृष्टीने आध्यात्मिक नव संघटनांच्या प्रसार आणि प्रचार तंत्रांचा अभ्यास करणे.
३. विदेशी साधकांच्या आध्यात्मिक अनुभवांचे निरीक्षण करणे.
४. आध्यात्मिक नवप्रवाहांमधील विभूतीपूजेच्या कारणांचा शोध घेणे.

## संशोधन पद्धती :-

प्रस्तुत शोधनिबंधात प्रामुख्याने गुणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला आहे. इंटरनेट आणि समाज माध्यमांवरील दुय्यम स्रोतांच्याद्वारे प्राप्त माहितीचा प्रामुख्याने वापर केलेला आहे. निरीक्षण आणि सहभागी निरीक्षण या तंत्रांचा देखील उपयोग केलेला आहे.

## विषय विवेचन / विश्लेषण :-

अर्थनीती आणि व्यापार ही जागतिकीकरणाची मूलभूत तत्वे आहेत. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात उदयास आलेल्या ह्या प्रक्रियेने आज संपूर्ण जगाला प्रभावित केलेले आहे. मुक्त व्यापार आणि खुली अर्थव्यवस्था ही अंगभूत वैशिष्ट्ये असलेल्या या प्रक्रियेने अमेरिकादी विकसित राष्ट्रांचाच अधिक फायदा झाला आहे असा आरोप देखील जागतिकीकरणावर केला जातो. असे असले तरीही, ह्या व्यापार प्रक्रियेत सहभागी होणे ही जणू काही अपरिहार्यताच असल्याचा अनुभव विशेषतः विकसनशील राष्ट्रांच्या वाट्याला आलेला आहे. सद्य परिस्थितीत भारत देखील यास अपवाद नाही. जागतिकीकरणाच्या अनिवार्यतेतून भारतात प्रवेशिलेल्या असंख्य बहुराष्ट्रीय कंपन्या, माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगती आणि त्यातून निर्माण झालेला नव-श्रीमंत वर्ग; यांच्यामुळे भारतीय समाजात तीव्र गतीने परिवर्तन होताना दिसत आहे.

***"जगाच्या विविध भौगोलिक क्षेत्रात राहणा-या लोकांमध्ये वाढते सामाजिक, आर्थिक, औद्योगिक व्यापारी, सांस्कृतिक संबंध दर्शविणारी व्यापक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय."*** - बायलिस आणि स्मिथ

"***जगातील विविध लोक राष्ट्रीय व समाज यांच्यामध्ये असलेल्या भौगोलिक व राजकीय सीमांचे उल्लंघन करून त्यांना जागतिक स्तरावर आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, व्यवहार मुक्तपणे करण्यास वाव देऊन एकच जागतिक व्यवस्था निर्माण करणे म्हणजे जागतिकीकरण होय."*** - प्रा.चंद्रकांत खंडागळे

अर्थ आणि व्यापारापुरते एकत्र आलेल्या जगाला मानवता, सर्वात्मता, विश्वात्मकता, विश्वबंधुत्व, इ. उच्चतम आध्यात्मिक मूल्यांनी एकत्र बांधणारे, वैश्विक कल्याणाचे उन्नत तत्त्व प्राचीन काळापासूनच भारतीय धर्मग्रंथांमध्ये आढळते. सर्वेऽपि सुखिन: सन्तु, वसुधैवकुटुंबकम्, जय जगत,इ. बोधवाक्यांमधून आपणास याचा प्रत्यय येतोच; परंतु प्राचीन भारताची ही वैश्विक ऐक्याचा आणि समग्र विश्वाचे कल्याण चिंतणारी भूमिका भारतापुरतीच मर्यादित राहिली.किंबहुना शैक्षणिक निर्बंध आणि संस्कृत भाषेचा विशिष्ट वर्गापुरताच प्रसार यामुळे विश्वगुरू बनण्याच्या पात्रतेची आमची भारतीय संस्कृती भारतात देखील सर्वच स्तरातील जनसामान्यांपर्यंत पोहोचू शकली नाही. समुद्र उल्लंघन करणे निषिद्ध असल्याने तिच्या वैश्विक विस्तारावर आपोआपच प्रतिबंध आलेत. तिची व्याप्ती विशिष्ट वर्ग-वर्ण आणि उच्च जातींपुरतीच मर्यादित राहिली. हिंदू धर्मापासून बंडखोरी करून वेगळ्या झालेल्या बौद्ध धर्माचा प्रसार आणि प्रचार भारताबाहेर विविध देशांमध्ये झाला व त्यानिमित्ताने बौद्ध तत्त्वज्ञान भारताबाहेर विस्तारले. विशेषतः पौर्वात्य देशांमध्ये त्याचा प्रभाव अधिक आढळतो.

११ सप्टेंबर १८९३ रोजी 'अमेरिकेतील माझ्या बंधूंनो आणि भगिनींनो'... अशी शिकागो येथील जागतिक सर्वधर्म परिषदेत साद घालणाऱ्या स्वामी विवेकानंदांमुळे जागतिक धर्म समुदायांना भारतीय आध्यात्मिकतेच्या अथांगतेचा आणि उत्तुंगतेचा प्रत्यय आला. पाश्चात्य जगतातून भारताकडे एक आध्यात्मिक केंद्र म्हणून आवागमन करणारा मुमुक्षुंचा समूह निर्माण झाला. भारताच्या आध्यात्मिक जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा तो आरंभबिंदू मानता येईल

आज २०२२ -२३ मध्ये भारताकडे आलेल्या G-20 देशांच्या अध्यक्षपदाचे निमित्त व औचित्य साधून भारत सरकारने **वसुधैव कुटुंबकम्** हेच ब्रीद या परिषदेसाठी निश्चित केलेले आहे. १७ मे २०१५ रोजी मंगोलियाच्या संसदेला संबोधताना भारताचे पंतप्रधान **नरेंद्र मोदी** यांनी ***भारत आणि मंगोलिया प्राचीन काळापासूनच विशिष्ट प्रकारच्या आध्यात्मिक संबंधांनी जोडले गेले आहेत*** ; असे प्रतिपादन केले होते. संयुक्त राष्ट्रसंघाने भारताने मांडलेल्या प्रस्तावास अनुकूलता दर्शवून २१ जून या दिवसास जागतिक योग दिवस म्हणून मान्यता दिली. जगातील सुमारे १७५ राष्ट्रांनी या योग दिनास मान्यता प्रदान करणे म्हणजे प्राचीन भारताच्या योग आणि अध्यात्मशास्त्रास स्वीकारून त्यांचे महत्त्व अधोरेखित करणे होय. अगदी अलीकडच्या काळात म्हणजे काही दिवसांपूर्वीच सौदी अरेबिया या देशाने त्यांच्या देशातील विद्यालये,विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये योगाभ्यासास ठळकपणे अधिस्वीकृती दिलेली आहे.

आजमितीस भारतात योग, अध्यात्म, ध्यान, प्राणायाम, कुंडलिनी शक्ती जागरण, आत्मज्ञान, मुक्तिबोध, सोऽहम्, इ. संकल्पनांचा प्रभाव प्रवर्धित करणाऱ्या आणि त्यांच्या प्रचारार्थ कार्य करणाऱ्या अनेक नव धार्मिक व आध्यात्मिक संघटना आहेत. ह्या नव- आध्यात्मिक संघटनांचा मोठा अनुयायी वर्ग संपूर्ण जगभरात विखुरलेला असून दिवसागणिक त्याच्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. जगातील जवळजवळ सर्वच प्रमुख शहरांमध्ये या नव-आध्यात्मिक संघटनांची साधना केंद्रे असून त्यांच्याद्वारे नियमितपणे आध्यात्मिक साधना केली जाते. अशा साधना मार्गांचा अवलंब करणारे असंख्य अनुयायी साधना केंद्रे व त्यांच्या माध्यमातून भारतातील प्रमुख नव-आध्यात्मिक संघटना केंद्र यांच्याशी जोडले गेलेले आहेत. प्रस्तुत केंद्रांच्याद्वारे चालविले जाणारे विविध साधना विषयक उपक्रमांना नियमितपणे अंगीकार करणारे अनेक अनुयायी आपल्याला दिसून येतात. त्यांच्या आध्यात्मिक साधनेतील विविध अनुभवांचा उल्लेख आपल्याला त्यांच्या आध्यात्मिक मार्गाच्या

संकेतस्थळांवर तसेच त्यांच्याद्वारे प्रकाशित होणाऱ्या नियतकालिकांमध्ये प्राधान्यक्रमाने छापलेला दिसून येतो. याचा परिणाम विशिष्ट नव-आध्यात्मिक संघटनांचा अनुयायी वर्ग आणि संघटन प्रमुखांची लोकप्रियता वाढण्यास होतो. स्वाभाविकपणे भारतीय अध्यात्माला जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत गती प्राप्त होते. तथापि अध्यात्म म्हणजे काय याचाही ऊहापोह होणे या ठिकाणी गरजेचे वाटते.

***"अध्यात्म म्हणजे आत्मविद्या आत्मसात करत करत 'मी' विसरण्याच्या सर्वात्मक सर्वोऽहं च्या उपलब्धीपर्यंतचा जाणिवेचा प्रवास होय. 'कोऽहं' म्हणजे 'मी' कोण आहे' या प्रश्नापासून 'सोऽहं पर्यंतची अनुभूती यात्रा म्हणजे अध्यात्म होय.***" - अण्णासाहेब मोरे (स्वामी समर्थ आध्यात्मिक विकास केंद्र)

बहुतांश नव-आध्यात्मिक संघटना ह्या व्यक्तीच्या आंतरिक विकासावर भर देताना दिसतात. त्यांचे विविध साधना संबंधित उपक्रम आणि क्रियाकलाप ह्या आंतरिक शक्तीचा विकास या घटकाभोवती केंद्रित झालेल्या आहेत. त्याद्वारे निर्भयता, आनंदप्राप्ती, आणि चिंतामुक्त जीवन व ध्येयप्राप्तीच्या दिशेने जाणारी सकारात्मक जीवनशैली यांचे आश्वासन ते आपल्या अनुयायांना किंवा साधकांना देतात.

अनुयायी वर्ग प्रत्यक्ष साधना अथवा उपासना उपक्रमांच्याद्वारे परस्परांच्या संपर्कात येतो. आध्यात्मिक अनुभवांची देवाण-घेवाण होते. जी संघटना, मार्ग आणि संघटन प्रमुख यांच्यावरील श्रद्धा अधिक दृढ करण्यास मदत करते. त्याचबरोबर आजच्या काळातील समाज माध्यमांचा मोठ्या खुबीने असे संघटन उपयोग करताना दिसतात. जसे- फेसबुक,ट्विटर, इंस्टाग्राम, इ. अशा समाज माध्यमांच्याद्वारे अनुयायी वर्ग साधना पथाशी अधिक दृढतेने जोडला जातो. संघटन प्रमुखांचा संदेश, त्यांची वचने,इ. सदर समाज माध्यमांच्याद्वारे पोहचविली जातात.

वर्तमान काळात आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्या नव-आध्यात्मिक संघटनांचे कार्य ठळकपणे लक्षात घ्यावे लागते त्यापैकी **निवडक** नव-आध्यात्मिक संघटनांची **संक्षिप्त** माहिती पुढील प्रमाणे-

**१. ट्रान्सेंडेंटल मेडिटेशन :-** महर्षी महेश योगी यांचे प्रेरणेने अमेरिकेत महर्षी फाउंडेशन (यू.एस.ए.) ही भावातीत ध्यान तंत्राचे शिक्षण देणारी संस्था स्थापन करण्यात आली. ही संस्था अमेरिकेत अमेरिकन फेडरल मान्यताप्राप्त 501 (C)(3) असून ना नफा तत्वावर कार्य करते. जाते.अभ्यासक्रम शुल्कातून जमा झालेली रक्कम संपूर्ण अमेरिका आणि जगभरातील प्रस्तुत संस्थेच्या शैक्षणिक आणि धर्मादाय उपक्रमांसाठी उपयोगात आणली जाते.

महर्षी महेश योगी यांनी १९७० च्या सुमारास सद्यस्थितीतील **भावातीत ध्यान** तंत्राचा प्रारंभ केला ट्रान्सेंडेंटल मेडिटेशनचे संक्षिप्त रूप TM असे आहे. हे वैशिष्ट्यपूर्ण आणि अद्वितीय असे ध्यानतंत्र म्हणून ओळखले जाते. केवळ २० मिनिटे डोळे मिटून मनात मंत्र स्मरण केले जाते. या ध्यानतंत्रात मंत्रांचा समावेश केला जातो. जे प्रत्येक अभ्यासकासाठी विशिष्ट असतात. याच्या अभ्यासासाठी सातत्यपूर्ण असा दैनिक सराव आवश्यक असतो.

वैदिक ध्यान, वैदिक संरक्षण, वैदिक कृषी तंत्र, वैदिक स्थापत्य रचना, वैदिक आणि सेंद्रिय अर्थव्यवस्था, वैदिक आरोग्य योजना, वैदिक व्यवस्थापन, इ. उपक्रम या संस्थेतर्फे देश विदेशात चालविले जातात. त्यांचे प्रशिक्षण साधकांना किंवा अनुयायांना दिले जाते.

**अनुभव.१.** हे ध्यान तंत्र नैसर्गिक आणि स्वाभाविकपणे केले जाते. कोणत्याही प्रकारचा दबाव किंवा ताण नसतो. त्यामुळे अतिशय आनंदपूर्ण असा अनुभव येतो. ध्यानामुळे मला स्वतःचा परिचय झाला आहे. माझ्यातील क्षमतांचा परिचय झाला आहे. त्याचप्रमाणे माझ्यातील सर्जनशीलतेचा प्रत्यय आला आहे.

-Jason Aviles CEO Flyogi LLC

**अनुभव.२.** अत्यंत अमूल्य आणि उपयुक्त असे ध्यान तंत्र असून ते लहान मुले, कुमार गटातील मुले तसेच प्रौढ आणि वृद्ध सर्वांच्यासाठी अत्यंत उपयुक्त असे आहे. बुद्धिमत्ता, ऊर्जा, आणि क्षमतांचा विकास करण्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. केवळ या शक्ती टिकून राहण्यासाठी नव्हे, तर खऱ्या अर्थाने त्यांची भरभराट होण्यासाठी हे ध्यान तंत्र उपयोगी आहे.

- Jennifer Aston, ABC News Chief Medical Correspondent.

अमेरिकेसह जगातील अनेक राष्ट्रांमध्ये ह्या ध्यानतंत्राचा अवलंब करणारी भरपूर मंडळी आहेत. त्यांची केंद्रे जगभर विखुरलेली आहेत. अमेरिकेत तर **महर्षी वेदिक सिटी (MVC)** या नावाचे एक छोटेसे शहर देखील वसवले गेले आहे. ज्याला जेफर्सन काऊंटी ,आयोवा स्टेट यांनी शहर म्हणून मान्यता देखील दिलेली आहे. 'महर्षी स्थापत्य वेद' या शैलीतील या शहराची रचना असून महर्षी महेश योगी यांनी पुनर्जीवित केलेली वास्तुकलाशैली आणि आराखडा प्रणाली या शहराच्या निर्मितीसाठी उपयोगात आणली गेलेली आहे. विविध धार्मिक परंपरा, सामाजिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी, असलेले अनुयायी या ठिकाणी एकत्र राहतात. ट्रान्सेंडेंटल मेडिटेशनचा प्रसार हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय मानतात.

### २. आर्ट ऑफ लिविंग:-

श्री श्री रविशंकर हे आर्ट ऑफ लिविंगचे प्रवर्तक आहेत. १९८१ मध्ये आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या लोकांना आधार देण्यासाठी आर्ट ऑफ लिविंग नावाची स्वयंसेवी संस्था त्यांनी स्थापन केली. श्री श्री रविशंकर यांना त्यांचे अनुयायी **गुरुदेव** म्हणून आदराने संबोधतात. ***जोपर्यंत आपले मन तणावमुक्त आणि समाज हिंसामुक्त नसेल तोपर्यंत आपण जागतिक शांतता प्राप्त करू शकत नाही.-*** श्री श्री रविशंकर. आर्ट ऑफ लिविंग समुदाय या दृष्टीने साधकाच्या जीवनाची जडणघडण करतो. गुरुदेवांच्या मार्गदर्शनाखाली यासाठी विविध कार्यक्रम व उपक्रम राबविले जातात. बंगलोर येथे मुख्यालय असलेल्या या संस्थेची जगातील १८४ देशांमध्ये केंद्रे आहेत. ताण-तणावांचे निरसन आणि आत्मविकासाशी संबंधित उपक्रम हे आर्ट ऑफ लिविंगच्या विशेष अशा श्वसनतंत्राशी संबंधित आहेत ज्यास **सुदर्शन क्रिया** अशी संज्ञा दिलेली आहे. ह्या सुदर्शन क्रियेचा अभ्यास हे आर्ट ऑफ लिविंग चे मुख्य सूत्र आहे.

आर्ट ऑफ लिविंग हे एक शैक्षणिक आणि मानवतावादी संघटन म्हणून अमेरिकेत सन १९८९ पासून कार्यरत आहे. संयुक्त राष्ट्र संघाने अशासकीय संघटना म्हणून १९९६ मध्ये आर्ट ऑफ लिविंगला मान्यता दिली. **संयुक्त राष्ट्रांच्या आर्थिक आणि सामाजिक परिषदेची विशेष परामर्श संस्था** असा दर्जा आर्ट ऑफ लिविंगला प्राप्त झालेला आहे. या संस्थेचे अनेक उपक्रम हे **International Association for Human Values** या भागीदार संस्थेमार्फत किंवा तिच्या सहकार्याने चालविले जातात. हे उपक्रम **अद्वैत वेदांत** तत्वज्ञानावर आधारित आहेत.

आर्ट ऑफ लिविंग च्या वतीने **जागतिक सांस्कृतिक महोत्सवांचे आयोजन** नेहमीच केले जाते. २०१२ मध्ये बर्लिन येथील ऑलिंपिक मैदानावर असाच कार्यक्रम झाला होता. २०१६ मध्ये अशाच प्रकारचा कार्यक्रम दिल्ली येथे संपन्न झाला होता. या महोत्सवास संपूर्ण जगाच्या कानाकोपऱ्यातून अनेक साधक आणि अनुयायी आलेले होते. ह्याच कार्यक्रमात डच पंतप्रधान Rudd Lubber, अमेरिकेतर्फे Nancy Pelosi , Kastherine Clark व Edward Wisthfield यांनी समिती

सदस्य म्हणून काम पाहिले होते. अनेक जागतिक दर्जाचे नेते मंडळी या उपक्रमास हजर होते. त्यात फ्रेंच पंतप्रधान, डॉमिनिक द विलेपिन, नेपाळी उपपंतप्रधान कमल थापा, सूरिनामचे उपराष्ट्रपती अश्विन अधीन, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा समावेश होता. ह्याच कार्यक्रमाचा **आंतरधर्मीय विश्वास संमेलन** म्हणून देखील प्रचार करण्यात आला होता. त्यात रेवरंड डॉ. गिराल्ड डर्ली, डॉ. अहमद बद्रुद्दीन हसून, मुक्ती मोहम्मद सईद खान, शंकराचार्य वासुदेवानंद सरस्वती यांच्यासारखे मोठे धार्मिक नेते उपस्थित होते.

जगातील प्रमुख नेत्यांनी श्री श्री रविशंकर यांचे जागतिक संस्कृती महोत्सवाचे आयोजन केल्याबद्दल कौतुक केले आणि त्यांना त्यांच्या देशात येण्याचे आमंत्रण देखील दिले. इंग्लंडचे तत्कालीन प्रधानमंत्री डेविड कॅमेरून यांनी संसदेच्या कनिष्ठ सभागृहास संबोधित करण्यासाठी त्यांना आमंत्रित केले. ऑस्ट्रेलियामध्ये पुढील महोत्सवाचे आयोजन करण्याचे आमंत्रण दिले गेले. १३२ देशातील ५० दशलक्ष लोकांनी आर्ट ऑफ लिविंगसह योग दिवस साजरा केला होता.

वरील सर्व प्रसंग आणि प्रतिक्रिया ह्या आर्ट ऑफ लिविंगला जागतिक मान्यता मिळाल्याची पुष्टी करतात.

**३. ईशा फाउंडेशन : -** ना नफा तत्वावरील आध्यात्मिक संघटन असून तामिळनाडूतील कोईमतूर जवळ १९९२ मध्ये सद्गुरु जग्गी वासुदेव यांनी त्याची स्थापना केली. आपल्या अनुयायांमध्ये ते प्रामुख्याने **सद्गुरु** म्हणून ओळखले जातात. **ईशा योग** या शीर्षकाखाली त्यांचे उपक्रम राबविले जातात. ***ईशा म्हणजे निराकार परमात्मा*** असा अर्थ अभिप्रेत असून सर्व जाती, धर्म, पंथाचे लोक त्यांचे अनुयायी आहेत.

भारतासह अमेरिका, ब्रिटन,लेबनॉन,ऑस्ट्रेलिया, मलेशिया,सिंगापूर, न्यूझीलंड, इ. अनेक देशांमध्ये ईशा फाउंडेशनचे कार्य चालते.

**ईशा योग** ही स्वतंत्र साधना पद्धती सद्गुरु जग्गी वासुदेव यांनी विकसित केलेली असून ती प्राणायाम,आसन आणि ध्यान या त्रिसूत्रीचे विशिष्ट प्रकारचे एकत्रित संयोजन आहे. अनुयायी, साधक आणि या क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मतानुसार ही एक स्वतंत्र अशी योगपद्धती आहे; जी पारंपरिक योग पद्धतीपेक्षा भिन्न आहे. तिचे उद्गाते सद्गुरु जग्गी वासुदेव यांच्या स्वानुभवावर आधारित अशी ही पद्धती आहे.

योग, ध्यान, ग्रामविकास, समाज कल्याण, आरोग्यविषयक शिबिरांचे आयोजन, वृक्षारोपण, पर्यावरण संरक्षण,इ. उपक्रमांच्या माध्यमातून कार्य केले जाते. विशेषतः महाशिवरात्रीचा त्यांचा उपक्रम हा अतिशय मोठ्या पातळीवर आणि संपूर्ण रात्रभर साजरा केला जातो. त्याचे प्रसारण पूर्ण रात्रभर मुख्य दूरचित्रवाहिन्यांवरून केले जाते. राष्ट्रपती, पंतप्रधान यासारख्या मोठ्या पदांवरील व्यक्तीदेखील अशा कार्यक्रमांना उपस्थिती लावतात. नुकत्याच फेब्रुवारी २०२३ मध्ये झालेल्या कार्यक्रमास राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उपस्थित होत्या.

सेंद्रिय धान्य आणि उपासनाविषयक वस्तूंची विक्री, जसे- लिंगभैरवी पेंडंट, कुंकू, सर्पाकार अंगठी, देवी अभयसूत्र, रक्षा, इ. त्याचप्रमाणे आयुर्वेदिक औषधे, रसायनमुक्त सौंदर्य प्रसाधने, अत्तर, रूम फ्रेशनर, कपडे, तांब्याची भांडी यासारख्या वस्तूंचादेखील विक्रीसाठी समावेश आहे. याशिवाय रेकी, एनर्जी, हीलिंग. सद्गुरूंसोबत प्रश्नोत्तर सत्र ,शंका समाधान, मार्गदर्शनपर उपक्रम देखील आयोजित केले जातात.

**जागतिक विस्तार :-** ईशा फाउंडेशन तर्फे ईशा योगाची जगभरात अनेक ठिकाणी साधना केंद्रे आणि आश्रम आहेत. फ्रान्स, जर्मनी, स्वित्झर्लंड, आयर्लंड, स्वीडन, नॉर्वे, डेन्मार्क, इस्रायल, युक्रेन, रशिया, इंग्लंड, आफ्रिका, युगांडा, मलेशिया, सिंगापूर,

न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया, चीन, हाँगकाँग, इंडोनेशिया, नेपाळ आणि थायलंड या देशांमध्ये ईशा फाउंडेशनची केंद्रे कार्यरत आहेत. त्यांची संख्या जवळपास ३०० च्या आसपास असून स्वयंसेवक म्हणून साधक आपली सेवा ह्या केंद्रांमध्ये देतात. त्यांचे व्यवस्थापन पाहतात. ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने केंद्रांची कार्यप्रणाली कार्यरत असते. ह्या केंद्रांमध्ये सूर्य क्रिया, भूतशुद्धी, आंतरिक अभियांत्रिकी, पंचभूत क्रिया, नाद आराधना यासारख्या साधना आणि उपासना पद्धतींचा अवलंब जगभरातील साधक करतात. प्रामुख्याने शिव ही ईशा फाउंडेशनची आराध्य देवता आहे; त्यामुळे त्यांच्या प्रत्येक साधनेत शिवतत्त्वाचा संबंध येतो. रोगमुक्ती, भयमुक्ति, अज्ञान मुक्ती, आणि जीवन मुक्तीसाठी आदियोगी शिवाची साधना उपयुक्त ठरते अशी ईशा योगाची मान्यता आहे.

## ४. योगदा सत्संग सोसायटी ऑफ इंडिया :-

***"तुम्ही हे जाणले की तुमच्या मध्ये काहीतरी उदात्त असे आहे; जे तुम्हाला माहिती नाही."*** असा संदेश आपल्या अनुयायांना देणाऱ्या परमहंस योगानंद यांनी १९१७ मध्ये ह्या संस्थेची स्थापना केली. ईश्वराचा शोध घेण्यासाठी आणि श्री श्री परमहंस योगानंद यांच्या **आध्यात्मिक आणि मानवतावादी कार्याची सेवा करण्यासाठी समर्पित मठांचा समुदाय** असा उल्लेख योगदा सत्संग सोसायटीचा केला जातो. **ऑटोबायोग्राफी ऑफ योगी** हे त्यांचे अत्यंत गाजलेले पुस्तक आहे. **क्रियायोग ध्यान** ह्या ध्यानतंत्राची त्यांनी निर्मिती केलेली असून जगावे कसे ? याची देखील तंत्रे त्यांच्यामार्फत अनुयायांना शिकविली जातात आणि त्यामुळे कित्येकांचा उद्धार झाला आहे; असे अनुभव साधकांनी मांडलेले आहेत. विशेषतः **पश्चिमेतील योगाचे जनक म्हणून परमहंस योगानंद** हे ओळखले जातात. **१९१७** मध्ये **योगदा सत्संग सोसायटी** आणि **१९२०** मध्ये **सेल्फ रिअलायझेशन फेलोशिप (SRF)** अशा संस्था त्यांनी अमेरिकेत स्थापन केल्या. क्रियायोग हे ध्यानाचे विज्ञान असून **सर्व धर्मांची अंतर्निहित एकता** ते मान्य करतात. शरीर, मन आणि आत्मा तसेच संतुलित स्वास्थ्य आणि निरोगी राहण्याची कला ह्या क्रिया योगाद्वारे शिकविल्या जातात.

**सहानुभूतीपूर्ण हृदयांचा आध्यात्मिक संघ** अर्थात **विश्वव्यापी प्रार्थना मंडल**. पृथ्वीला बंधुभाव, सद्भावना आणि शांतीद्वारे सुरक्षित करण्यासाठी म्हणून मनोभावे, हृदयाच्या अंतःस्थ भावनेने प्रार्थना केली पाहिजे अशी शिकवण या मंडलामार्फत दिली जाते. अशा प्रार्थनेचे विशेष प्रशिक्षणक्रम आयोजित केले जातात. अशी प्रार्थना करण्यासाठी कोणताही धर्म जाती पंथ वंश यांचे बंधन नाही. कोणत्याही नव-आध्यात्मिक संघटनाचे अनुयायी असलेली व्यक्ती देखील निर्विवादपणे आणि निरपेक्ष भावनेने ही प्रार्थना करू शकते. असा दावा ह्या संघटनामार्फत केला जातो. या उपक्रमास संपूर्ण जगभरातून मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळतो.

## जागतिक विस्तार :-

आज सेल्फ-रिअलायझेशन फेलोशिपमध्ये जगभरातील ६०० हून अधिक मंदिरे आणि केंद्रे समाविष्ट झाली आहेत आणि १७५ हून अधिक देशांमध्ये तिचे सदस्य आहेत. भारत आणि आसपासच्या देशांमध्ये, परमहंस योगानंद यांचे कार्य भारतीय योगदा सत्संग सोसायटी (YSS) म्हणून ओळखले जाते, ज्यात २०० हून अधिक केंद्रे, विश्रामगृहे आणि आश्रम आहेत.

उपरोक्त केवळ काही नव-आध्यात्मिक संघटनांचीच विवेचनात्मक विश्लेषणात्मक माहिती सादर केली आहे. आध्यात्मिकता हा अधिष्ठानात्मक पैलू महत्त्वाचा असून ध्यान, आत्मिक जाणीव, ताण-तणावांचे निरसन, व्यक्तीला स्वतःतील दिव्यत्वाची जाणीव, इ. उद्दिष्टांची साधनापथाशी एकरूपता व तदानुषंगाने स्वीकृत केलेल्या विविध उपासना पद्धती यांचे

नियोजन प्रस्तुत आध्यात्मिक संघटनांच्याद्वारे प्रभावीपणे केले जाते. वरील निवडक आध्यात्मिक संघटनांच्या व्यतिरिक्त सिद्धयोग ध्यान फाउंडेशन, निर्मला माता प्रणित सहज योग, ओशो इंटरनॅशनल, ओशो लोटस् कम्यून, प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, दलाई लामा,माता अमृतानंदमयी, सत्य साई नीलयम,श्री अरविंद आश्रम, रामकृष्ण मिशन, इ. अनेक नव-आध्यात्मिक संघटन या दृष्टीने सक्रिय आहेत. यापैकी बहुसंख्य संघटनांना जागतिक मान्यता प्राप्त झालेली आहे आणि जगाच्या विविध भागातून त्यांचे अनुयायी या संघटनासाठी आपली साधना आणि साधने बरोबरच सेवा अर्पण करतात. भारताच्या दृष्टीने भारतीय आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचे हे एक प्रकारचे जागतिकीकरणच आहे. या संदर्भात पुढील निरीक्षणे ठळकपणे नोंदविता येतील.

## निरीक्षणे:-

१. या सर्व नव-आध्यात्मिक संघटनांच्या माध्यमातून भारतीय हिंदू आध्यात्मिक तत्त्वज्ञान आणि साधनापद्धती जगभर प्रसारित होण्यास मदत झाली आहे.
२. सर्व नव-आध्यात्मिक संघटना ह्या स्वयंविकसित नव-ध्यान तंत्रांवर आधारित आहेत.
३. धर्मप्रसार किंवा धर्मांतर हे या संघटनांचे उद्दिष्ट नाही. तर साधकाचा मूळ धर्म कायम ठेवून केवळ मन:शांती, आत्मोन्नती व आनंददायी जीवन या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी साधनेचा अवलंब केला जातो.
४. विश्वशांतीसाठी तणावमुक्त मन आणि हिंसामुक्त समाज घडवण्याचा उद्देश या संघटना बाळगतात.
५. सर्व धर्मांमध्ये अंतर्निहित एकता असल्याचेदेखील या संघटना मान्य करतात.
६. अनेक विदेशी राष्ट्रांमध्ये भारतीय नव-आध्यात्मिक संघटनांच्या स्थावर जंगम मालमत्ता आहेत.
७. समाज माध्यमांच्या प्रभावी वापराद्वारे साधकांचा समूह स्थापित केला जातो.
८. वर्तमान काळातील नव-आध्यात्मिक संघटना विविध वस्तूंची विक्री, दक्षिणा, शुल्क, दान, यात्रा, सहली, इ. माध्यमातून मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल करतात.
९. काही अपवाद वगळता बहुतांश संघटना संघटनप्रमुखांची छायाचित्रे पूजा स्थानी ठेवतात .
१०. यामुळे बऱ्याचदा साधक व्यक्तीपूजक बनतो व विभूतीवाद बळावतो; जो अंधश्रद्धेस पोषक ठरतो.

## निष्कर्ष :-

१. विदेशातील विशेषतः पाश्चात्त्य राष्ट्रांतील अनेक नागरिकांना भारतीय अध्यात्म आणि योगविद्या यांच्याविषयी आकर्षण निर्माण झालेले असून सफल,सर्जनशील,आनंददायी आणि अर्थपूर्ण जीवन जगण्यासाठी भारतीय अध्यात्म उपयुक्त आहे असे त्यांना वाटते.
२. आत्मशोध किंवा मी कोण आहे? ह्या प्रश्नाचे उत्तर प्राप्त करण्याची जिज्ञासा अनेक साधकांना नव-आध्यात्मिक संघटनांकडे आकर्षित करते.
३. जागतिकीकरण ही प्रक्रिया केवळ आर्थिक आणि व्यापार क्षेत्रापुरती मर्यादित न राहता नव-आध्यात्मिक संघटनांच्या कार्यामुळे भारतीय आध्यात्मिकतेच्या जागतिक विस्तारास कारणीभूत ठरली आहे.
४. संयुक्त राष्ट्रे आणि विविध राष्ट्रांनी भारतीय योग आणि अध्यात्म यांना मान्यता दिल्यामुळे त्यांची अधिकृतता आणि उपयुक्तता अधिक सुस्पष्ट बनते.

५. नव-आध्यात्मिक संघटनांच्या आर्थिक उलाढालीमुळे जागतिकीकरणाच्या अर्थ आणि व्यापार या अटींचीदेखील परिपूर्ती होताना दिसते.

## शिफारसी :-

१. जागतिक सांस्कृतिक महोत्सवांचे आयोजन अधिक प्रमाणात व्हावे.
२. व्यक्तीपूजा आणि विभूतीवाद यांचे स्तोम वाढू नये याची काळजी घ्यावी.
३. आध्यात्मिक चंगळवाद निर्माण होणार नाही याची खबरदारी घ्यावी.
४. भारताची वसुधैवकुटुंबकम् ही भूमिका या संघटनांच्या माध्यमातून अधिक व्यापकपणे प्रदर्शित व्हावी.

## संदर्भ :

1. Subramaniam Arundhati (2013). Sadhguru : More than a life. New Delhi,India:Penguin,India.
2. Paramahansa Yogananda.(1998). Autobiography Of a Yogi.Kolkata,India:Yogoda Satsanga Society Of India
3. Swami Radhanath.(2013).The Journey Home : Autobiography Of an American Swami. Kolkata, India. Jaico Publishing House.
4. Sri Sri Ravi Shankar.(1996).God Loves Fun.Bengaluru,India:Sri Sri Publications
5. श्री श्री रविशंकर.(2009). जीवन एक सुंदर उत्सव. बंगळुरू,श्री श्री पब्लिकेशन्स.
6. खंडागळे प्रा.चंद्रकांत रघुनाथ. (2021).धर्माचे समाजशास्त्र अर्थात धर्म-मीमांसा , सांगली,भारत.
7. खंडागळे प्रा.चंद्रकांत रघुनाथ.(2017). जागतिकीकरण आणि समाज. कोल्हापूर,भारत: दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ;.

## वेब संदर्भ :-

https://en.m.wikipedia.org
https://www.maharishimaheshyogi.in
https://www.artofliving.org
https://www.isha.sadhguru.org
https://www.yogananda.org
https://www.yssofindia.org
https://wmaharashtratimes.com